# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २८/०५/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०५) इतिवृत्त**

**मंगळवार, दिनांक २८ मे २००८ रोजी** स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **मलीक अंबर स्थायी समिती सभागृह** येथे दुपारी ५-०० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला श्री.उध्दव घुगे, उप आयुक्त(म), श्री.एम.ए.पठाण, नगर सचिव यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. अ. रशीद खान (मामू)
२. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
३. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
४. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
५. श्री. जावेद हसन खान
६. श्री. संजय जोशी
७. श्रीमती जयश्री किवळेकर
८. श्री. कचरू सोनवणे
९. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
१०. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
११. श्री. सिताराम सुरे

**<u>संवाद :</u>**

| | |
|---|---|
| श्री.संजय जोशी | : स.सदस्य श्री.संजय शिरसाट यांचे वडील स्व.पांडुरंग शिरसाट यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले त्यांना या सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी. |
| श्री.अ.रशिद खान | : यास माझे अनुमोदन आहे. |
| मा.सभापती | : सर्वांनी श्रध्दाजंलीसाठी उभे रहावे.<br>(यावेळी स्व. पांडूरंग शिरसाट यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.) |
| श्री.अ.रशिद खान | : पानचक्की ते मेडीकल कॉलेज रस्त्याच्या बाजूला फुटपाथवर लोकांनी झोपडया टाकल्या असून तेथे घोडे बांधण्यात येतात. त्यामुळे दुर्गधी येते. ते काढले जात नाही. टपऱ्या हटविल्या जातात फुटपाथवरील अतिक्रमण का काढले जात नाही. |
| उपआयुक्त (म.) | :सदर अतिक्रमण दोन दिवसात हटविण्यात येईल. |
| श्री.अ.रशिद खान | : फुटपाथवर घरे बांधली. प्रथम घरे हटवावीत. प्रथम झोपड्या हटवाव्यात. |
| उपआयुक्त (म.) | : सर्वच अतिक्रमण हटविण्यात येईल. काहीच ठेवण्यात येणार नाही. |
| श्री.अ.रशिद खान | : महापालिकेच्या काही मालमत्ता भाडे तत्वावर देण्यासाठी टेंडर काढले, आजपर्यत करारनामा होत नाही. संबधीत अधिकारी नाही असे कारण दाखविले जाते हे बरोबर नाही. |
| उपआयुक्त(म.) | मालमत्ता अधिकारी रजेवर असून त्यांचा अतिरिक्त पदभार सहाय्यक आयुक्त -२ यांचेकडे आहे. प्रलंबीत सर्व संचिका काढण्याचे काम चालू आहे. दोन दिवसात कार्यैवाही होईल. |

श्रीमतीजयश्री किवळेकर : सिडकोतील अतिक्रमण काढण्याचे जेंव्हा जेव्हा आम्ही सुचना मांडतो त्या त्या वेळी वार्ड अधिकारी यांचेकडे ही यंत्रणा दिली जाईल असे सांगण्यात येते. दोन वर्षापासून सांगितलेले एकही अतिक्रमण काढले नाही. जुने शहर व सिडको वेगळे असे काही नाही सर्वच ठिकाणी अतिक्रमण दिसून येते. एखादे ठराविक अतिक्रमणे हटविले जाते पुन्हा त्याकडे लक्ष दिले जात नाही. सिडको बसस्टॅण्ड ते मुंकूदवाडी रेल्वेस्टेशन पर्यत हातगाड्यांची मोठी वर्दळ झाली. ते अतिक्रमण काढण्यात यावे. सिडको भाग कुणाकडे दिला आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : सिडकोतील अतिक्रमणे काढण्यासाठी काय व्यवस्था केली श्री.वाहूळ यांना निदर्शनास आणून देवून ३-४ महिणे झाले कार्यवाही केली नाही. सिडको होते तेंव्हा अतिक्रमण नव्हते आता जास्तीचे झाले आहे. सतत राबविणारी ही एक योजना असते. जे काढले तेथे पून्हा होवू नये याची सुध्दा दखल घेतली पाहिजे. सिडको भागात अतिक्रमण होवू नये याची दखल घ्यावी. आता ऊसाच्या गाड्या लागतात. अधिकारी नेमा, परवाने द्या.

श्री.मोहन मेघावाले :अतिक्रमणावर एक वर्षापासून चर्चा होते. सिडको हडको भागात मोठया प्रमाणात अतिक्रमण होत आहे. टी व्ही सेन्टर चौकात संभाजी महाराज यांचा पुतळा असून बाजुला अंडा आम्लेट, फ्रुट दुकाने रस्त्यावर दिसून येते. रसवंतीला किती जागेची परवानगी दिली. सायंकाळी ७ ते १० वाजेच्या दरम्यान त्या रस्त्यावरून महिलाना जाण्यास त्रास होतो. पावसाळा सुरू झाला रसवंतीला आतापर्यत परवानगी नसेल, आजही रसवंती चालू आहे. अनेक वेळा सुचना केल्या, अतिक्रमण काढण्याची कार्यवाही केली जात नाही.

श्री.संजय जोशी :मागिल बैठकीत सिडकोसाठी वेगळा विभाग करणार होते. त्यावर रूलींग पण झाले कार्यवाही केली नाही, शहरात सुध्दा वेगाने अतिक्रमण वाढत आहे. गजानन महाराज मंदीर रस्त्यावर मोठे अतिक्रमण दिसून येते. अमरप्रित हॉटेल ते बीडबायपास रस्त्यावर पाईप लाईन व लाईट शिफ्टींगसाठी ६५ लक्षचे टेंडर काढून काम केले. रस्ता क्लिअेर झाला नाही म्हणून कामाची निविदा रस्ते विकास महामंडळाने काढली नाही आता दीड-दोन महिण्यापासून तेथे माठ विक्री करणारे लोक तेथे जनावरे बांधतात, झोपडया टाकल्या. त्या लोकांना नगरसेवकांनी तक्रार केली म्हणून काढतो, त्यांना आमच्याकडे पाठवितात. ते लोक येतात विनंती करतात असा मार्ग दाखविणे चुकीचे आहे. अतिक्रमण काढण्यास महापालिका सक्षमतेने काम करीत नाही हा माझा आरोप आहे. शहानुरमिया दर्गा जवळ दोन चाकी वाहने जावू शकत नाही. अनेक वेळा संबधीत विभागाला कळविले कार्यवाही नाही. यावर ठोस निर्णय व्हावा व ही मोहिम दर दोन तीन महिण्याला सुरू केली पाहिजे. मोहिम राबवितांना संबधीताना माहिती मिळू नये याची सुध्दा दखल प्रशासनाने घेतली पाहिजे. अनेक माठवाले, माठासोबत झाडे, कुंड्यासुध्दा विकतात. ते हटवावे. शहर स्वच्छ दिसेल. यामूळे जे टॅक्स भरतात त्या नागरीकांना त्रास होतो. मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण पहिल्यांदा काढावे.इमारत निरीक्षक किती व कोणत्या भागात कोणाची नियुक्ती आहे.याचीही माहिती द्यावी.

श्री.सतीश कटकटे : सिल्लेखाना ते लक्ष्मण चावडी रस्त्यावर अतिक्रमण संदर्भात पेपरमध्ये प्रसिध्द झाले होते. नगरसेवक पत्र देतात तरीही कार्यवाही होत नाही. तसेच क्रांती चौक ते पैठणगेट रस्त्यावरील अतिक्रमण वाढत आहे, त्वरीत काढावे.

श्री.कचरू मोरे : अतिक्रमणामूळे रस्ते लहान होत आहेप्रशासनाने अनेक वेळा नियोजन केले. वॉर्ड क्र. ९२, ९३ अतिक्रमण काढले जात नाही. एमआयटी कॉलेजच्या रस्त्यावर अतिक्रमण झाले आहे तसेच महापालिकेच्या ज्या ज्या ठिकाणी इमारती आहे. त्याचा आधार घेवून तसेच वेंदांत हॉटेल च्या रस्त्यावर पूढे अनंत गाडे चौकात

अतिक्रमण झाले. चौकातून मोठी वाहने वळविता येत नाही. एसएससी बोर्ड ते रेल्वेस्टेशन गेट पर्यतच्या रस्त्यावरील सर्व अतिक्रमण काढावे.

श्री.संजय जोशी : पैठण गेट ते क्रांतीचौक रस्त्यावरील कब्रस्थानच्या बाजूचा रस्ता रूंदीकरणासाठी काही भाग काढला शांततेच्या मार्गाने काम केले. कौतूकास्पद बाब आहे परंतू पूढे फुल, फळे विक्रेत्यांना हटविले नाही. जे निघते ते काढले जाते असे हाऊ नये. जे दादागिरी करतील त्यांना बसू द्यायचे हे बरोबर नाही.

श्री.अ.रशिद खान : मुकूंदवाडी रेल्वेस्टेशन वरील अतिक्रमण काढले नाही. प्रकरण कोर्टात नेले. मा.न्यायालयाने निर्देश दिले तरीही काढले नाही. तीन लोकाच्या मूळे थांबले आहे त्वरीत काढावे. वार्डनिहाय ऐनवेळी वेळ ठरवून अतिक्रमण मोहिम राबवावी. जेणे करून पुन्हा पुन्हा तेथे येण्याची संधी मिळणार नाही. दररोज सायंकाळी रिपोर्ट द्यावा.

श्री.संजय जोशी : छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते मुकूंदवाडी रेल्वेस्टेशन रस्ता किती फुट आहे. सिडको हस्तांतरण होण्यापुर्वी किती फुटाचा होता. त्या रस्त्याच्या साइड गटारसाठी २५ लक्ष खर्च केले माझे माहिती प्रमाणे एकाही ठिकाणी नाली अस्तित्वात नाही. गुंठेवारीमध्ये परवानगी दिली का? याची सर्व माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी.

मा.सभापती : आताच स. सदस्य श्री. संजय जोशी यांनी जो मुद्दा मांडला त्यासंबंधी संचिकेसह सर्व माहिती संबधीत अधिकारी यांनी पूढील बैठकीत सादर करावी. या विभागात कर्मचारी किती, कोणत्या भागासाठी कुणाची नियुक्ती या संदर्भात माहिती द्यावी.

प्र.प्रशासकीय अधिकारी : यापूर्वी १४ इमारत निरीक्षक होते, आता ५ आहेत तीन लोकांची कालच ऑर्डर काढली दोन रूजू झाले श्री.जाधव श्री. मुनीर रूजू झालेले नाही. सर्वसाधारण पणे एक वार्डसाठी एक इमारत निरीक्षक असावे.प्रत्येक दिवशी माहिती घेवून दुस-या दिवशी ते अतिक्रमण काढण्याचे नियोजन होते. परंतू इमारत निरीक्षकाची संख्या कमी असल्यामूळे तीन ते चार वार्ड एका इमारत निरीक्षकाकडे दिले होते. त्यामूळे ही मोहिम यशस्वीपणे राबविता आली नाही.

श्री.सतीश कटकटे : दै.सामना मध्ये अतिक्रमण झालेचे आले होते त्याची दखल घेतली नाही जे कार्यरत आहे त्यांनी आतापर्यंत कोणत्या ठिकाणी कार्यवाही केली.

प्र.प्रशासकीय अधि. : शहर एवढे मोठे आहे की, अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही केल्यावर वृत्तपत्रात येतेच असे नाही. काल अजीम कॉलनी भागात टॉवर्सचे बांधकाम काढले. पेपरला दिले स.सदस्य श्रीमती मेहरून्नीसा खान यांचे वार्डातील अतिक्रमण काढले, कटकट गेट भागातील एक स्लॅबचे बांधकाम तोडले.

श्री.संजय जोशी : प्रशासनाला वाटते तेच अतिक्रमण काढले जाते. काल बसैय्येनगर मधील वैयक्तीक प्लॉटवरील अतिक्रमण होते ते काढण्याचा आपल्याला अधिकार नाही. विनापरवानगी बांधकाम असेल तर नोटीस दिली जाते त्यांनतर पूढील कार्यवाही होते. विनापरवानगी अतिक्रमण म्हणून काढले नियमाने बरोबर आहे का?

प्र.प्रशासकीय अधि. :अतिक्रमण म्हणून काढलेच नाही. बांधकाम होते.

श्री.संजय जोशी :जवळच्या व्यक्तीने सांगितल्यानुसार ते अतिक्रमण लगेच काढले जात. सामान्य व्यक्तीला वेठीस धरले जाते हे बरोबर नाही. पोलीस संरक्षण घेतले जाते का? किती पोलीस आहेत.

प्र.प्रशासकीय अधि. : पोलीस नियत्रंण कक्ष महापालिकेकडून काढून घेतले आहे. ज्या वेळेस पोलीसांची आवश्यकता लागेल त्यावेळी पत्र देवून मागणी करून त्याच बरोबर नगररचना विभागाचे अधिकारी बोलवून कार्यवाही केली जाते.

श्री.संजय जोशी : पोलीसांचा पगार बंद केला का? पोलीस नियत्रंण कक्ष पोलीस विभागाकडे गेल्याचा प्रकार कुणाही पदाधिकारी यांना माहित नाही.

| | |
|---|---|
| उपआयुक्त (म.) | : ज्या वेळेस मागणी करतो त्या त्या वेळी पोलीस येतात. पोलीसांचा मागिल वर्षभरापासून पगार देत नाही. |
| श्री.संजय जोशी | :अतिक्रमण काढण्यासाठी सिडकोचा भाग वेगळा करावा उपआयुक्त श्री. शेटे यांचेकडे सध्या काय काम आहे. |
| उपआयुक्त (म.) | : उप आयुक्त श्री. शेटे यांचेकडे सध्या कोणताच पदभार नाही. |
| श्री.संजय जोशी | : २०-२५ हजार रूपये पगार उपआयुक्त श्री.शेटे यांना असेल, सक्षम अधिकाऱ्याकडून प्रशासन काम सुध्दा करून घेत नाही. खेदाची बाब आहे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : त्यांचेकडे चार्जच नाही तर रूजू करून घेण्याची गरज काय? ठराविक अधिकाऱ्याकडेच ठराविक विभागाचे चार्ज ठेवावे असे प्रशासनाचे धोरण आहे का? हे योग्य नाही. |
| श्री.संजय जोशी | :श्री. शेटे यांचेकडे आजपासून सिडकोतील अतिक्रमण काढण्यासाठीचा चार्ज द्यावा. दोन इमारत निरीक्षक नियुक्त केले त्यांना त्यांचेकडे द्यावे. संपूर्ण शहरासाठी तीनच इमारत निरीक्षक आहे आणखी संख्या वाढवावी. |
| श्री.मोहन मेघावाले | : सिडको/हडकोसाठी सक्षम इमारत निरीक्षक द्यावे. नगरसेवकांनी तक्रार केली म्हणून काढतो आहे असे त्या नागरीकांना कर्मचाऱ्यांनी म्हणू नये. याबद्दलही ताकीद द्यावी. |
| श्रीमती जयश्री किवळेकर | : जी सूचना स. सदस्यांनी केली उपआयुक्त श्री. शेटे यांचेकडे सिडकोचा चार्ज देवून आवश्यक कर्मचारी, दोन इमारत निरीक्षक, वाहन व इतर यंत्रना दयावी.यास माझे अनुमोदन देते श्री. शेटे यांना सिडकोची जास्त माहिती नाही ती त्यांनी करून घ्यावी अतिक्रमण काढतांना नगरसेवकांचे नाव दाखवू नये. सन २००१ मध्ये डॉ. भागवत कराड हे महापौर असतांना सिडको बसस्टॅण्ड चौकाच्या बाजूला स्व्. वसंतराव नाईक यांचा पुतळा ६ लक्ष खर्च करून उभारण्यात आला आज त्या पुतळयाच्या बाजूला मोठे अतिक्रमण झाले आहे. दोन वर्षापासून पुतळा दिसत नाही तेथील अतिक्रमण काढावे. एन -३ भागात छत्रपती शिवाजी कॉलेज जवळ रस्ताच्या बाजूला फुटपाथवर टपऱ्या आहे. तसेच कामगार चौकातील अतिक्रमण काढावे. अतिक्रमण काढल्यानंतर पून्हा होते ते हावू नये याचीही दखल घेण्यात यावी. |
| मा.सभापती | : टी.व्ही. सेंटर चौकाच्या बाजूला तसेच सिडको बसस्टॅण्ड जवळील चौकात असलेल्या स्व.वसंतराव नाईक यांचे पुतळयाच्या बाजूचे सर्व अतिक्रमण, इतर जी जी ठिकाणे सदस्यांनी नावे सुचविले त्या सर्व ठिकाणचे अतिक्रमण त्वरीत काढण्यात यावे अहवाल ताबडतोब माझेकडे सादर करावा. |
| उपआयुक्त(म) | : उद्याच या पुतळयासमोरील अतिक्रमण काढण्यात येईल. |
| श्री.सतीश कटकटे | : पैठण गेट ते क्रांतीचौक रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात यावे. |
| सौ.मोमीन सफिया | : वार्ड क्र. ९६ मध्ये सागर हॉटेल ते शहानुरमिया दर्गा ते बीडबाय पास रस्त्याचे काम आदिनाथ कन्स्ट्रक्शन करीत असून काम चांगल्या प्रतीचे होत नाही. प्रशासनाला अनेक वेळा पत्र दिले परंतू त्याची दखल प्रशासन घेत नाही. या कामाची तपासणी व्हावी तरच बील द्यावे नसता मला या संदर्भात मा.न्यायालयात नागरीकांसाठी दाद मागवावी लागेल. |
| अति.शहर अभियंता | : त्या रस्त्याचा दर्जा राखण्यासाठी श्रीखंडे कन्सल्टंट नावाची पीएमसी नियुक्त केली आहे. कामाचा दर्जा चांगला आहे म्हणून त्यांनी वेळोवेळी रिपोर्ट महापालिकेला केलेले आहे. निविदेमध्ये जे अटी-शर्ती आहेत त्या प्रमाणे काम होत आहे. |

**विषय क्र. २९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, खिजरी (हत्ती) गेट या ऐतिहासिक दरवाज्याची दुरूस्ती करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२१,००,०००/- चे असून या कामाची ई-निविदा विभागातर्फे निविदा मागविण्यात आल्या असता, एकुण २ निविदापत्रक विक्री झाले व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत २ निविदा दरपत्रक प्राप्त झाले. सदर कामाच्या निविदेचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

१. मुबारक मेहबुब पठाण ९.२५% कमी दराने

२. गायत्री आर्कीटेक्ट ७.२५% कमी दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा मुबारक मेहबुब पठाण यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.२५% कमी दराने आहे. सदर दरास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी मुबारक मेहबुब पठाण यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.२५% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

<u>संवाद :</u>

| | |
|---|---|
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : यापूर्वी ज्या ऐतिहासिक दरवाजाचे काम केले त्यांचे काम पूर्ण झाले का, बिल देण्यात आले का यासंबंधीची माहिती घ्यावी. |
| अति.शहर अभियंता | : सविस्तर माहिती पुढील बैठकीत दिली जाईल. |
| श्री.संजय जोशी | : पूढील वेळेस माहिती द्यावी स्थगिती द्यावी. |
| मा.सभापती | : आताच विचारलेली माहिती पूढील बैठकीत प्रशासनाने द्यावी. हा प्रस्ताव तोपर्यत स्थगित करण्यात येतो. |

**ठराव :**

सभागृहात झालेल्या निर्णयानुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

## : ऐनवेळचे विषय :

**विषय क्र. ३० :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, मा.स्थायी समिती यांनी ठराव क्र. ७६ अन्वये महानगरपालिकेतील नगर सचिव, उप आयुक्त(म.), उप आयुक्त(सिडको) यांचेसाठी अतिथी भत्ता म्हणून रू.७००/- प्रती महिना मंजूर केला आहे. कर निर्धारक व संकलक या पदाचा अतिरिक्त कार्यभार उप आयुक्त(सिडको) यांच्याकडे असल्याने सदरचा प्रस्ताव सादर करतेवेळी कर निर्धारक व संकलक यांच्या विभागाचा स्वतंत्ररित्या विचार करण्यात आलेला नव्हता. करिता उपरोल्लेखीत प्रमाणे कर निर्धारक व संकलक यांना अतिर्थी भत्ता मंजूर करण्यात यावा.

सुचक : श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर, श्री. संजय जोशी

अनुमोदक : श्री.कचरू सोनवणे, श्री.के.व्ही.मोरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.स्थायी समिती यांनी ठराव क्र.७६ अन्वये ज्याप्रमाणे नगर सचिव, उप आयुक्त(म.), उप आयुक्त(सिडको) यांचेसाठी अतिथी भत्ता म्हणून रू.७००/- प्रती महिना मंजूर केला आहे. त्याप्रमाणेच कर निर्धारक व संकलक यांना अतिथी भत्ता म्हणून रू.७००/- प्रती महिना मंजूर करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ३१ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्थायी समिती सभा दिनांक ५/२/२००८ मधील ठराव क्र. ३३४ अन्वये घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प संदर्भातील प्रस्ताव मंजुर झाल्यानुसार **M/s.Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad** यांनी दाखल केलेली घन कचरा व्यवस्थापन व हाताळणी संबंधीची १० वर्षे मुदतीची व रूपये १०८.५ कोटी खर्चाची निविदा स्विकारणेस मंजुरी मिळालेली होती. वास्तविक पाहता निविदा संहिता कलम ७३ नुसार निविदा अंतिम करण्याचे अधिकार स्थायी समितीला आहेत. जी निविदा स्थायी समितीकडे अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात आली होती व तद्नंतर मनपाचे धोरण निश्चित करणारी सर्वोच्च समिती मा.सर्वसाधारण सभेने सदरील मक्ता ७ वर्षाऐवजी १० वर्षे कालावधीचा करावा म्हणून ठराव पारीत केला. निविदेतील सर्वात महत्वाची अट कामाचा कालवधी ही होती. त्यात बदल झाल्यामुळे संपूर्ण निविदा प्रक्रीया रद्द करून नव्याने निविदा काढणे याकरीता देकार मागवणे आवश्यक ठरते. ही प्रक्रीया या ठिकाणी पूर्ण करण्यात आलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे यात आर्थिक नुकसान होत असल्याचे दिसते. महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा विचार करता निविदेतील बदललेल्या अटीच्या अनुषंगाने नवीन अटी-शर्तीसह पुनःश्च निविदा प्रकाशीत होणे आवश्यक आहे.

करीता अटी-शर्ती बदलून मंजूर केलेली निविदा रद्द करण्यात येऊन घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी करीता फेरनिविदा काढण्याची कार्यवाही करण्यात यावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| सुचक | अनुमोदक |
|---|---|
| अ. रशीद खान मामू | दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर |
| संजय रामदास जोशी | वसंत नरवडे पाटील |
| मोरे कचरू विश्वनाथ | खान जावेद हसन कासीम खान |
| मोमीन सफीया फिरदौस | रविकांत काशीनाथ गवळी |
| मोहन मेघावाले | कचरू श्रीपत सोनवणे |
| सितराम इसराम सुरे | सतीश विश्वनाथ कटकटे |
| श्रीमती जयश्री किवळेकर | नारायण तिलोकचंद कुचे |

**<u>संवाद :</u>**

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : मंजूरी देण्यात यावी.

मा.सभापती : मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार घन कचरा व्यवस्थापन व हाताळणी संबंधीची १० वर्षे मुदतीची व रूपये १०८.५ कोटी खर्चाची निविदा संहिता कलम ७३ नुसार निविदा अंतिम करण्याचे अधिकार स्थायी समितीला असल्यामुळे निविदेतील सर्वात महत्वाची अट कामाचा कालवधी ही होती. त्यात बदल झाल्यामुळे संपूर्ण निविदा प्रक्रीया रद्द करून नव्याने निविदा काढणे याकरीता देकार मागवणे आवश्यक असल्याचे या सभागृहाचे मत आहे. ज्यामुळे महानगरपालिकेचे यात आर्थिक नुकसान होत असल्याचे दिसते. म्हणुन महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा विचार करता निविदेतील बदललेल्या अटीच्या अनुषंगाने घन कचरा व्यवस्थापन व हाताळणी प्रकल्पासाठी नवीन अटी-शर्तीसह पुनःश्च निविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ३२ :</u>**

श्री.शेख मोहंमद युनुस, आरोग्य निरीक्षक, व श्री. तौसीफ कुरैशी, सेवक, आरोगय विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी, कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२००७/१३४, दिनांक २९/१/२००७ अन्वये त्यांचे दोन वार्षिक वेतनवाढी कायमस्वरूपी पुढील वेतनवाढीवर परिणाम होईल अशा रितीने थांबविलेल्या वार्षिक वेतनवाढी पुर्ववत सुरू करणे व निलंबन काळ हा सेवाकाळ म्हणुन गृहीत धरणे व अनुज्ञेय होणाऱ्या रजेत रूपांतरीत करण्यासंबंधी सादर केलेल्या अपीलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.शेख मोहंमद युनुस, आरोग्य निरीक्षक, व श्री. तौसीफ कुरैशी, सेवक, आरोगय विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी, कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२००७/१३४, दिनांक २९/१/२००७ विरूध्द सादर केलेले अपील मान्य करण्यात येते.

सदरील आदेशान्वये त्यांच्या थांबविलेल्या दोन वार्षिक वेतनवाढी देय दिनांकापासून पुर्ववत सुरू करण्यात याव्यात व निलंबन काळ हा सेवाकाळ म्हणुन गृहीत धरून अनुज्ञेय रजेत रूपांतरीत करण्यास न्यायालयीन निर्णयाचे अधिन राहून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**स्थायी समिती सभा**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक (०५)**

**दिनांक :- २६/०५/२००८**

## सू च ना

दिनांक २७/५/२००८ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आलेली स्थायी समितीची सभा आता **बुधवार दिनांक २८/५/२००८ दुपारी ४.३० वाजता** 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे आयोजित करण्यात येत आहे. सभेची विषयपत्रिका (कार्यक्रम पत्रिका क्र.०५) यापुर्वीच वक्तशीर वितरीत करण्यात आलेली आहे.

कृपया सभेच्या दिनांकातील व वेळेतील बदल लक्षात घेवून या सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद